# F.Y.B.A. SEM – II (CBCS -2016 COURSE) : WINTER - 2017

## SUBJECT : MARATHI (G1) - II

Day : **Friday**
Date : **03/11/2017**

**W-2017-0014**

Time : **03.00 P.M. To 06.00 P.M.**
Max. Marks : 60.

---

**सूचना:**

१) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
२) उजवीकडील अंक गुणांचा निर्देश करतात.
३) मराठी भाषेच्या लेखननियमांनुसार लेखन करणे आवश्यक आहे.

---

**प्र.१ अ)** पुढीलपैकी योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा. (०६)

१) कवितेऐवजी ----- विकली असती तर बरे झाले असते?
(अ) रद्दी (ब) पिशवी (क) पुस्तके (ड) भाजी

२) ----- माणूस हे सुर्वे यांच्या कवितेचे केंद्र आहे?
(अ) शोषणग्रस्त (ब) दुष्काळग्रस्त (क) पूरग्रस्त (ड) भूकंपग्रस्त

३) नारायण सुर्वे यांच्या वडिलांचे नाव ----- हे होते.
(अ) सिताराम सुर्वे (ब) तुकाराम सुर्वे (क) गंगाराम सुर्वे (ड) सखाराम सुर्वे

४) नारायण सुर्वे यांची कविता ----- दृष्टी ठेवून माणुसकीचे मूल्य जपणारी आहे.
(अ) राजकीय (ब) आर्थिक (क) सामाजिक (ड) धार्मिक

५) ----- ही कविता एका लोकोत्तर पुरूषावरची आहे?
(अ) सत्य (ब) विचार (क) नेहरू गेले त्या वेळची गोष्ट (ड) कार्लमार्क्स

६) नारायण सुर्वे यांनी ----- या कवितेतून वेश्या-वस्तीचे चित्र रेखाटले आहे.
(अ) शब्दांचे ईश्वर (ब) पाणी घे (क) विचार (ड) माझे विद्यापीठ

**ब)** पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (०६)

१) केशवसुत आणि मर्ढेकर यांच्यानंतर मराठी कवितेला वळण देण्याचे काम कोणी केले?
२) नारायण सुर्वे यांच्या आईचे नाव काय?
३) नारायण सुर्वे यांची कोणती प्रेमकविता बावनकशी सोने म्हणून ओळखली जाते?
४) नारायण सुर्वे यांच्या पहिल्या काव्यसंग्रहाचे नाव काय?
५) ‘भेटला हरेक रंगात माणूस’ या काव्यपंक्ती कोणत्या कवितेतील आहेत?
६) नारायण सुर्वे यांचा जन्म कोणत्या शहरात झाला?

**प्र.२** नारायण सुर्वे यांच्या काव्यलेखनामागील प्रेरणा विशद करा. (१२)

**किंवा**

‘नारायण सुर्वे यांची कविता श्रमिकांच्या जगाचे दर्शन घडवते’- चर्चा करा.

**कृ.मागे पहा**

**प्र.३** पुढीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे लिहा. (१२)

**क)** 'तेव्हा एक कर' या चिंतनपर कवितेचा आशय तुमच्या शब्दात लिहा.

**ख)** 'मर्ढेकरांशी बातचीत' ही कविता रसिकाला अंतर्मुख करणारी आहे- सोदाहरण लिहा.

**ग)** नारायण सुर्वे यांच्या प्रेमकवितेचे स्वरूप स्पष्ट करा.

**प्र.४** पुढीलपैकी कोणत्याही **तीन** विषयावर विवेचक टीपा लिहा. (१२)

**क)** 'तुमचंच नाव लिवा' या कवितेतील धगधगीत वास्तव

**ख)** 'चार शब्द' मधील काव्यविषयक भूमिका

**ग)** 'असा कसा दगड झालो' मधील वत्सल भावना

**घ)** नारायण सुर्वे यांच्या कवितेतील प्रतिमा

**च)** 'नेहरू गेले त्या वेळची गोष्ट' कवितेमधील व्याकुळता

**प्र.५ अ)** महाविद्यालयात नुकतीच एक काव्यस्पर्धा घेण्यात आली; तिचा **वृत्तांत** लिहा. (०६)

**किंवा**

रौप्यमहोत्सव समारंभानिमित्त प्रकाशित करावयाच्या स्मरणिकेची रूपरेषा तयार करा.

**आ)** ऑलंपिकमध्ये निवड झालेल्या एका नवोदित महिला धावपटूची **मुलाखत** लिहा. (०६)

**किंवा**

''ग्रंथपरीक्षण ही एक प्रकारे आस्वादक समीक्षा असते''- चर्चा करा.

* * *